CMYK

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

सकारात्मक विचार करा,
सुंदर जीवन जगा.



पुढील पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांची पेरणीसाठी धावपळ पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 122 ■ बुधवार दि.11 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5



# परिवहन मंत्र्यांच्या जिल्ह्यातील बसस्थानकात १० कोटींचा चिखल

## धाराशिव बस स्थानकात दोन फूट पाणी, प्रवाशांचे हाल; उद्घाटन होऊन दीड महिना लोटला तरी कामे अपूर्णच,स्लॅबवर साचले तळे

आरंभ मराठी | धाराशिव

**धाराशिव बस स्थानकाचे काम हाती घेतल्यानंतर धाराशिवकरांना एक सुसज्ज आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणारी इमारत पहायला मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु, धाराशिवकरांचा मोठा अपेक्षाभंग झाला असून, नवीन बस स्थानकात दहा कोटींचा फक्त चिखल पहायला मिळत आहे. बस स्थानकाचे उद्घाटन होऊन दीड महिना झाला तरी अजूनही आतील काम सुरूच आहे. त्यातच निकृष्ट कामाची भांडाफोड झाली असून, जागोजागी फरशीला चिरे गेले आहेत. काही ठिकाणी फरशी फुटली आहे. स्लॅब ची लेव्हल न काढल्यामुळे स्लॅब वर पाण्याचे तळे साचले आहे. त्यामुळे भविष्यात बस स्थानकाला गळती लागण्याची शक्यता आहे. बस स्थानकाची अवस्था पाहता दहा कोटींचा चिखल झाल्याची भावना प्रवाशांतून व्यक्त होत आहे.**

धाराशिव शहरात नवीन सुसज्ज बस स्थानक व्हावे अशी मागणी खुप वर्षांपासून होत होती. अखेर २०२३ मध्ये या मागणीला यश मिळाले. धाराशिव शहरात सुसज्ज बस स्थानक उभे राहावे यासाठी तत्कालीन पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत आणि आमदार राणा पाटील यांनी प्रयत्न केले. बस स्थानकासाठी राज्य शासनाने तब्बल दहा कोटींचा निधी मंजूर केला. बस स्थानकाचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी ही शहराच्या सौंदर्यात भर घालणारी इमारत असेल असा गाजावाजा केला. तब्बल दीड वर्षे बस स्थानकाचे बांधकाम करण्यात आले. अखेर दिनांक १ मे रोजी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते नूतन बस स्थानकाचे उद्घाटन करण्यात आले. परंतु, एकच महिन्यात बस स्थानकाच्या पोकळ इमारतीचे वास्तव समोर आले. इमारतीचे पन्नास टक्के काम अजून बाकी असताना उद्घाटनाची घाई करण्यात आली.त्यामुळे आता ऐन पावसाळ्यात प्रवाशांचे मोठे हाल होत आहे. बस स्थानकातील प्राथमिक कामे देखील पूर्ण झाली नसताना उद्घाटनाची घाई का करण्यात आली? असा सवाल विचारण्यात येत आहबस स्थानकाच्या आवारात काँक्रीटीकरण न केल्यामुळे बस स्थानकात अक्षरशः तळे साचले आहे. यामुळे बस मध्ये चढताना आणि बसमधून उतरताना महिलांना आणि वृद्धांना मोठी कसरत करत उतरावे लागत आहे. बस स्थानक परिसरात तब्बल दोन फूट पाणी साचल्यामुळे बस चालक आणि वाहक यांनाही मोठी कसरत करावी लागत आहे. बस स्थानकात बस आल्यानंतर आणि बस गेल्यानंतर संपूर्ण राडारोडा पसरलेला असतो. काही वेळा प्रवाशांच्या अंगावर चिखल उडून येतो. त्यामुळे बस स्थानकात येणारे प्रवासी वैतागून गेले आहेते.











### फरशा फुटल्या, स्लॅब वर साठले तळे

बस स्थानकाचे उद्घाटन करून फक्त चाळीस दिवस झाले आहेत. अशातच प्रवासी बसण्यासाठी केलेल्या हॉल मधील तीन फरशा फुटून गेल्या आहेत. इतर फरशांना देखील तडे गेले असून, यातून बांधकामातील बोगसगिरी समोर येत आहे. बस स्थानकाचा पुरेसा वापर नसतानाही फरशा फुटत असल्याचे दिसून येत आहे. तर दुसरीकडे स्लॅब चे कामदेखील बोगस झाल्यामुळे स्लॅब वर पावसाच्या पाण्याचे तळे साचले आहे. स्लॅब ला स्लोप न काढल्यामुळे पाणी स्लॅब वरच मोठ्या प्रमाणावर साचले आहे. यामुळे नवीन बस स्थानकाला भविष्यात गळती लागण्याची शक्यता आहे.

### फलाटाच्या बाजूला पायऱ्या नसल्यामुळे वृद्धांची अडचण

सोलापूर फलाटाच्या बाजूला बस स्थानकाच्या इमारतीत येण्यासाठी साडेतीन फुटांचा कठडा चढून वर यावे लागते. याठिकाणी पायऱ्या करण्याची तसदी न घेतल्यामुळे वृद्ध आणि महिला प्रवाशांना बस स्थानकात न बसता खालीच आसरा घ्यावा लागत आहे. सोलापूर बाजूच्या फलाटाकडेच सर्व बस लागत असल्यामुळे याठिकाणी प्रवाशांची मोठी गर्दी होते. त्यामुळे अपघात होण्याचा धोका देखील वाढला आहे.

## उधार डिझेल दिले नाही म्हणून आग लावून दहा लाखांचे नुकसान

आरंभ मराठी | वाशी

उधार डिझेल दिले नाही म्हणून शेतातील ऊस आणि नारळाच्या झाडांना आग लावून नुकसान केल्याची घटना वाशी तालुक्यातील लोणखस शिवारात घडली. यातील आरोपी भिमराव जनार्धन देशमुख (रा. लोणखस ता. वाशी), मनोज डोके (रा. ईट ता. भुम) यांनी दिनांक २ मे २०२५ रोजी ११ वाजता लोणखस शिवारातील शेतात (गट नं १० व ११) फिर्यादी धनराज संभाजीराव उंदरे (वय ४२ वर्षे, रा.लोणखस ता. वाशी) यांनी नमुद आरोपींना डिझेल उधार दिले नसल्याचा राग मनात धरुन त्यांच्या ऊसाचे पिक तसेच पपईची झाडे, नाराळाची झाडे, ठिबक पाईप व मल्चींग पेपरला आग लावून जाळून अंदाजे १० ते १२ लाख रुपयाचे नुकसान केले. याप्रकरणी धनराज उंदरे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे वाशी येथे भा.न्या.सं.कलम ३२६, ३२९(१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## १०८ फुटी भवानी तलवार प्रदान करतानाचे शिल्प उभारणार

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर विकास आराखड्यांतर्गत श्री तुळजाभवानी देवी छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार प्रदान करत असलेले भव्य १०८ फूट उंचीचे शिल्प उभारण्यात येणार आहे. या शिल्पास कला संचलनालयाची मान्यता मिळणार असून, त्याच्या निर्मितीस लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती मंदिर संस्थानचे विश्वस्त व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आमदार पाटील म्हणाले की, हे शिल्प ऐतिहासिक दृष्टिकोन लक्षात घेऊन तयार केले जाणार आहे. शिवाजी महाराजांच्या काळातील वेशभूषा, शरीरयष्टी आणि त्या काळातील वातावरण यांचा अभ्यास करून इतिहासकार व तज्ज्ञांच्या सल्ल्याने कला संचलनालय शिल्पनिर्मितीचे निकष ठरवणार आहे. या भव्य शिल्पासाठी इच्छुक शिल्पकारांनी अडीच ते तीन फूट उंचीच्या शिल्पाचा नमुना कला संचलनालयाकडे सादर करावा, असे आवाहन आमदार पाटील यांनी केले. कला संचलनालय प्राप्त नमुन्यांमधून पाच उत्कृष्ट नमुन्यांची निवड करणार असून त्यातूनच अंतिम शिल्प निवडले जाईल. या शिल्पाच्या उभारणीसंदर्भात मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून मंदिर संस्थान अंतिम निर्णय घेईल, असेही आमदार पाटील यांनी स्पष्ट केले. हे शिल्प तुळजाभवानी देवी मंदिराच्या ऐतिहासिक वैभवात भर घालणार असून भाविकांसाठी एक आकर्षण केंद्र ठरणार आहे. या उपक्रमामुळे तुळजापूरचे धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व अधिक वृद्धिंगत होणार असून, पर्यटनासही चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### म्हणून लाडूंचा प्रसाद

तुळजाभवानी देवीच्या प्रसादासाठी लाडू ऐवजी पेढ्यांचा वापर करावा या दैनिक 'आरंभ मराठी'तील वृत्ताची दखल घेत आमदार पाटील म्हणाले की, भाविकांना प्रसाद म्हणून देण्यासाठी पेढ्याचा देखील विचार करण्यात आला होता. मात्र पेढ्याची टीकवण क्षमता कमी असते. तसेच त्यामध्ये भेसळ देखील होवू शकते, त्यामुळे लाडू हा प्रसाद म्हणून अंतिम केला असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र हे लाडू मशीनद्वारे न बनवता हाताने बनवण्यात येणार असून, यामुळे स्थानिक महिलांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## चारित्र्यावर संशय विवाहितेचा छळ; घरावरून ढकलून देऊन जिवे मारण्याचा प्रयत्न

### नवरा, दीर, सासू व नणंदेवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | येरमाळा

माहेरहून पैसे आण म्हणून विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबद्दल नवरा, दिर, सासू आणि ननंदेवर येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी नवरा किरण बिभीषण पौळ (रा. तेरखेडा ता. वाशी ह.मु. जम्मु), सासू निर्मला बिभीषन पौळ, दिर संदिप बिभीषन पौळ, नणंद स्वामी राजेंद्र डांगे आणि नंदावा राजेंद्र बाबुराव डांगे (रा. चिंचवड, पुणे), चुलत दिर स्वप्नील बालाजी पौळ यांनी दिनांक १२ जुलै २०१९ ते ९ जून २०२५ पर्यंत तेरखेडा येथे फिर्यादी वैष्णवी किरण पौळ (वय २५ वर्षे, रा. तेरखेडा, ह.मु. नांदगाव ता. वाशी) यांना आरोपींनी माहेरहुन पैसे आणण्याच्या कारणावरुन व चारित्र्यावर संशयावरुन शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली व घरावरुन ढकलून देवून जखमी केले तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. आरोपींनी फिर्यादीला वारंवार शारिरीक व मानसिक त्रास दिला. याप्रकरणी वैष्णवी पौळ यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम ८५, ८६, ११८(१), ११८(२),११५(२), ३५२, ३५१(२) (३), ३५१(४), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक उद्या धाराशिवमध्ये

आरंभ मराठी | धाराशिव

परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक हे उद्या गुरुवारी (दि.१२) धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. सरनाईक हे सकाळी ८ वाजता सोलापूर येथून खाजगी वाहनाने नळदुर्गकडे प्रयाण करतील. सकाळी ९ वाजता नळदुर्ग येथे आगमन व ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याची पाहणी करतील. सकाळी १० वाजता नळदुर्ग येथून धाराशिवकडे प्रयाण. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे आगमन व खरीप हंगामाच्या तयारीबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतील. त्यानंतर दुपारी १२:१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून मोटारीने कळंबकडे प्रयाण.दुपारी १:१५ वाजता कळंब येथे शिवसेना संपर्क कार्यालयाचे उद्घाटन. त्यानंतर मस्साजोग,ता.केज, जि.बीड येथे प्रयाण करतील.



## होमगार्डला शिवीगाळ करून मारहाण; एकावर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | बेंबळी

कर्तव्यावर असलेल्या होमगार्ड ला शिवीगाळ करून बेदम मारहाण केल्याप्रकरणी एकावर बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अक्षय घाडगे (रा. बेंबळी ता. जि. धाराशिव) याने दिनांक ८ जून रोजी उजणी कॉर्नर भंडारी शिवार येथे फिर्यादी किशोर एकनाथ सोनटक्के (वय २३ वर्षे, व्यं. नोकरी होमगार्ड, स. नं. १४४९ धाराशिव पथक रा. राघुचीवाडी) हे बकरी ईदच्या अनुषंगाने उजणी कॉर्नर येथे नेमण्यात आलेल्या नाकाबंदी पॉईंटवर कर्तव्य बजावीत असताना आरोपीने फिर्यादीच्या कर्तव्यात व्यत्यय आणुन शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. किशोर सोनटक्के यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे बेंबळी येथे भा.न्या.सं.कलम १३२, १२१(१), ३५२, , ३५१(२) (३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

CMYK

# खरा संत कोण..?



संत म्हणजे साधू,सज्जन धार्मिक, आध्यात्मिक,सामाजिक अध्यापन करणारा समाज कल्याणासाठी वाहून घेणारा चांगला माणूस.काही माणसे साधू,संत वाटतात,ते साधुसंत असल्याचा आव आणतात,पण ती लबाड ढोंगी ,लोकांना फसवून स्वार्थ साधतात.खरा संत हा खरोखरच चांगला माणूस असतो.तो दुसऱ्यांना त्रास देत नाहीत.त्यांचा छळ करत नाहीत.त्यांना कशाची हाव नसते.त्यांना स्वार्थ नसतो.ते आपण ते लोकांना नेहमी चांगला उपदेश,मदत करतात.


संत गाडगेबाबा हे खरे संत होते.ते लोकांची कामे निस्वार्थ भावनेने कामे करत.त्यांनी जनतेला स्वच्छतेचा संदेश दिला. ते जनतेकडून कोणताही मोबदला न घेता काम करत आणि भिक्षा मागून आपले जीवन व्यतीत करत होते. खरा संत जनतेच्या कल्याणासाठी वाहून घेतो.आपल्या देशात अशी अनेक संत,महापुरुष , राष्ट्रसंत होवून गेले जे त्यांनी देशासाठी आपले सर्वस्व अर्पण केले.बाबा आमटे,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,अशी अनेक नावे आहेत की,समाजसेवा हीच ईश्वर सेवा म्हणून समाज उपदेश करीत होते. हे सगळे खरे संत होते. परंतू अलीकडील काळात देशात असे अनेकसंतउदयासआलेआहेतकी,त्यांचंआयुष्य,राहणीमान, वागणे,बोलणे,महागड्या गाड्या,हे बघितल्यावर वाटते कीआपण ही बाबा व्हावे.पण मागे होवून गेल्यालेच्या विचार केला तर हे सर्व क्षणिक समाधान आहे.

या महाकुंभ मेळ्याच्या निमित्ताने जगभरातील साधुसंत येताना दिसतात.त्यात अनेक भोंदू साधू संत आढळताना दिसतात. हे आधुनिक संत...... शील हेच सर्वश्रष्ठ भूषण आहे.शील म्हणजे चांगले गुण,चांगले वागणे,बोलणे ज्यांच्याकडे चांगले गुण आहेत ते सर्वांना आवडत असतात.अनेक जण आपण चांगले दिसावे म्हणून सोन्याचे दागिने घालतात. चांगले कपडे परिधान करतात.पण आधी माणसे मनाने वाईट असतील तर,त्यांच्याकडे चांगले गुण नसेल तर, त्यांनाकोणचांगलेम्हणेलकाय?.सोन्याचेदागिने,उंचीकपडे, लवजमा,महागड्या मोटार हे फक्त डोळ्यांना दिसणारे क्षणिक शारीरिक भूषण आहे.तर शील म्हणजे चांगले गुण हे मनाचे भूषण आहे.मनाचा दागिना आहे.शील नसलेला माणूस लोकांचे वाईट करतो. खूप श्रीमंत माणूस , साधुसंत म्हणजे चांगला माणूस असे नसते.फक्त शिकलेला माणूस चांगला असेही नसते.चांगला गुण असलेला माणूस असतो,लोक त्यांच्याशी आदराने वागतात, प्रेमाने बोलतात.म्हणून आपण शीलवान असले पाहिजे असा संदेश पूर्वीच्या साधुसंत, महापुरुषांनी जनतेस दिला आहे. परंतू अलीकडील काळात परिस्थिती खूपच बदलेली आहे.जीवन शैली वेगळी होत चालली आहे. ज्यांच्याकडे पैसा आहे तो खरा माणूस, संत साधू असा समज झाला आहे.पण पैसा, श्रीमंती हे क्षणीक, क्षणभंगुर आहे. याचे चिंतन करण्याची वेळ आज आपल्या जनतेला व इतर क्षेत्रातील नागरिकांनी करणे गरजेचे असे वाटते. पूर्वीपासून आपल्या देशात साधू संतांनी मनुष्य जीवनात धर्म-दर्शन आणि मानसशास्त्राच्या आधारावर सभ्यतेचे अनेक नियम बनवलेले आहेत.या नियमांचे पालन योग्य दिशेने केल्यास आपले जीवन उज्वल बनते हे खरे साधू संतांनी सांगितले आहे. परंतू आधुनिक काळात राजकीय संत फार मोठ्या प्रमाणात उदयास आले आहेत.खरे तर साधू संतांनी देशातील राजकीय घडामोडी यावर बोलणे किंवा त्याचे समर्थन करणे किंवा राजकीय व्यासपीठावरून वक्तव्य करणे त्याच्याशी यांचा काहीही संबंध नाही.आपले आध्यात्मिक ,सामाजिक मार्गाने जाण्याचे सोडून भलतीकडे भरकट जाणे योग्य नाही. मग ते कोणत्याही धर्माचे, पंथाचे असो. त्यांनी आध्यात्मिक , सामाजिक मार्गाने जनतेला उपदेश करणे,प्रवचन करणे, ज्ञानार्जन करणे. तसेच समाजातील वाईट प्रवृतीस मुख्य प्रवाहात आणून त्यापासून त्यास प्रवृत्त करणे नाही की त्याचे समर्थन करणे. अलीकडील काळात बरेचसे साधुसंत राजकीय आखाड्यात उतरले आहेत. त्यामुळे जनतेचा आध्यत्मिक,धार्मिक याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे.त्यामुळे खरा साधू आणि खरा संत कोण हे ओळखणे कठीण झाले आहे.



सोमनाथ बेलुरे
धाराशिव
मो. ९८५००३६६४६

# कबीरांच्या दोह्यातले अंतरंग



विश्वात अनेक देश आहेत, त्यामध्ये भारताचे एक आगळे वेगळे स्थान आहे. या देशाची' देवभूमी 'म्हणून अशी एक ओळख सुद्धा आहे. या देवभूमीत ऋषी, संत, साधू, सत्पुरुष, विचारवंत, तत्वेतांची खाण आहे. विश्वात दडून बसलेले सत्य, दृष्टी पलीकडचे दर्शन संत आपल्या ग्रंथाद्वारे करून देत असतात. ग्रंथात काय असते..? तर संत संतांची विचार सुमने..

त्यांचा आत्मानुभव.. मानवी जीवाचे निर्गुन निराकार परमेश्वराचे दर्शन योग घडून आणण्याचे कार्य ग्रंथ आणि संत करीत आलेले आहे. संत हे जीवावर निरतिशय प्रेम करतात. मानवातील षड्गुणांचा निचरा करून शाश्वत सुखाचा मार्ग ते दर्शवितात. जात, धर्म, वर्ण, वंश, भेदांच्या पलीकडे सर्वश्रेष्ठ असा मानव धर्म आहे. अशा मानव धर्माची पुर्नस्थापना करण्यासाठी संत समाजात राहूनच आगळ्या वेगळ्या कार्याचा अविट ठसा उमटवितात. विविध धर्म, संस्कृती, परंपरेने नटलेल्या देवभूमीत अनेक संतांनी लोककल्याणार्थ आणि विश्वाच्या हितार्थासाठी आपला देह झिजवला. त्यांच्या कर्मधर्म संयोगानेच ते अमरत्वपदाला पोचले. नव्हे नव्हे तर आजही ते आपल्या शब्द सामर्थ्याने, त्यांच्या बहुमोल वचनाने सुप्तशक्ती व्दारे समाजात वावरत असतात. अशाच संतरत्नांपैकी एक संत कबीरदास होय.त्यांनी रचलेल्या हिंदी पद्यरचना, दोहे आजही असंख्य मानवाच्या मुखोद्गोत आहेत. ते आपल्या लेखणीच्या रूपाने मानवी जीवनाचे मर्म.. मानवतावादी विचार.. जाती धर्मावर अत्यंत पोटतिडकेने दोह्यातून मांडतात.मानवाला हा सर्वश्रेष्ठ व सर्वात बुद्धिमान असा प्राणी म्हणून गणना होते. अशा मानवाला संत कबीरदास म्हणतात.'' दुर्लभ यह मानुष जन्म देह ना बारम्बार तरुवर जो पत्ती झडे बहुरि नलागे डार ''

ज्याप्रमाणे झाडाचे पान एकवेळा तुटले की, परत जोडता येत नाही. अगदी तसेच मानवाच्या बाबतीत आहे. मानवाचा जन्म अत्यंत दुर्लभ आहे, तो पुन्हा पुन्हा मिळणे शक्य नाही. म्हणून प्राप्त मानव देहाचा सदुपयोग करून घ्या! असेच कबीरदास दोह्यातून सांगतात. आपल्या पूर्व जन्माच्या कर्मफळानेच मानव जन्म लाभला आहे. म्हणून त्याचा थोडा तरी सदुपयोग करून घ्यावा. तरचं जीवन जगण्यालायक होईल. निष्काम, निस्वार्थ,निरिच्छ भावनेने केलेले कर्म प्रारब्धाच्या रूपाने जमा होत असते. करिता कर्म - कर्तव्य विना विलंब,विना संकोच केलीचं पाहिजे.

'' कल करे सो आज कर आज करो सो अभी
पल मे प्रलय होगा बहुरी करोंगे कब ''

उपरोक्त दोह्यातून कबीरदासजी मानवाला सतर्क करतात की,सत्य संकल्पाची कामे त्वरित करावी. नाहीतर जीवन हे काळाच्या अधिन आहे. मानवी देहाबद्दल कबीरदास म्हणतात.

'' ये तन हे कागद की पुढीया
बुंद पडत गल जाओगे ''

काम, क्रोध,मोह,माया, दंभ, घृणेपायी माणूस माणूसपण विसरला आहे. मानव जीव हा शिवाचा अंश असून त्यात अनंत दैवी शक्ती वास करीत असते. भगवंताने तुला मानव देह दिला आहे, तो कशासाठी हे तू जाणून घे! म्हणूनच तर कबीरदासजी म्हणतात.

'' आया था तू किस काम से
सोया तू चादर तान
सुरत संभाले गाफील ।
अपने आप पहचान ''

जीवनात कर्तेपणाचा अहंकार असू नये. शुद्ध अंत:करणाने एखाद्या कर्मयोग्या प्रमाणे व्रतस्थ जीवन जगावे. यातच माणसाचे खरे सुख, समाधान व ऐश्वर्य आहे . दिलेले वचन शब्द प्राणाहून प्रिय मानणारे आपल्या भूमीत असंख्य जन्माला आलेत. शब्दासाठी वनवास पत्कारणारे, अख्या आयुष्याचा होमकुंड करणारे, शब्दालाचं संपत्ती मानणारे संत या भूमित घडले आहेत . शब्द हे दुधारी शस्त्र मानल्या जाते. शब्दबाणाने मनावर आघात होतो. तर शब्दानेच दुरावलेली मने जोडण्याचं कार्य होत असते. म्हणून शब्द हा तोलून, मापून, घासून वापरावा. कबीरदासांचा पुढील दोहा मानवाला बरंच काही शिकून जातो.

'' शब्द शब्द सब कोई करे
शब्द के हाथ ना पाव
एक शब्द औषधी करे
एक शब्द करे घाव ''




शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# जिल्हा टीबी फोरम व कोमॉर्बिडिटी कमिटीच्या बैठकीत क्षयरुग्णांसाठी महत्त्वाचे निर्णय

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील क्षयरोग नियंत्रण व निर्मूलनासाठी महत्वपूर्ण पावले उचलत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा टीबी फोरम व कोमॉर्बिडिटी कमिटीची संयुक्त बैठक नुकतीच पार पडली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार होते.विशेष उपस्थिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांची होती. या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरदास व जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजित बनसोडे यांनी क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. त्यांनी 'टीबी मुक्त भारत अभियान', 'टीबी मुक्त ग्राम पंचायत' ' डिफरेंशियल टीबी केअर' आणि 'प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत' या महत्वाच्या विषयांवर सादरीकरण केले. जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी जिल्ह्यातील क्षयरुग्ण शोधण्याच्या कार्याला अधिक बळ देण्यासाठी आठ नवीन मशीन खरेदी करण्याच्या सूचना दिल्या.यामुळे क्षयरोग निदान प्रक्रियेत गती येणार असून रुग्णसंख्येच्या तुलनेत अधिक अचूक आणि वेगवान तपासणी शक्य होणार आहे. क्षयरुग्णांच्या पोषण आहारासाठी ''फूड बास्केट'' उपक्रमात जनसहभाग वाढावा यासाठी औद्योगिक क्षेत्र,बँका,तसेच शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी पुढे



येऊन क्षयरुग्णांना दत्तक घेण्याचे आणि पोषण आहार पुरवण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.या उपक्रमाअंतर्गत दोन क्षयरुग्णांना आज प्रत्यक्षात फूड बास्केट वितरित करण्यात आले. या बैठकीला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.शिवाजी फुलारी,तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे छातीरोग तज्ज्ञ डॉ.प्रवीण डूमणे यांच्यासह जिल्हा क्षयरोग केंद्राचे कर्मचारी आणि समिती सदस्य उपस्थित होते.

# डॉ.रामचंद्र भालचंद्र यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दृष्टीदिन पंधरवडा उपक्रमास प्रारंभ



आरंभ मराठी | धाराशिव


शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्रविभागातर्फे राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत 'दृष्टीदिन पंधरवडा' चे उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा पंधरवडा दिवंगत डॉ.रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रित्यर्थ १० जून ते २४ जून २०२५ या कालावधीत राबवण्यात येत आहे.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ.तानाजी लाकाळ,नेत्रविभाग प्रमुख डॉ.अनुजा कंदले, नेत्रशल्यचिकित्सक डॉ.एम.के. पल्ला, डॉ.महेश पाटील,डॉ.ज्योती कानडे, डॉ.सुनंदा सूर्यवंशी, डॉ.सायली कोकाटे, अधिसेविका सुमित्रा गोरे, नेत्रचिकित्सा अधिकारी बाळासाहेब घाडगे,रामराजे बिडवे,श्रीकांत कल्याणी, निलेश कुरील,तसेच जिल्ह्यातील सर्व नेत्रचिकित्सा अधिकारी,वैद्यकीय महाविद्यालयाच्या विविध विभागांचे वॉर्ड इन्चार्ज व अधिपरिचारिका यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ.महेश पाटील यांनी 'दृष्टीदिन पंधरवडा' साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करत,नेत्रसुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले.डॉ.ज्योती कानडे यांनी डॉ.भालचंद्र यांच्या कार्याचा आदरपूर्वक उल्लेख करत सांगितले की,त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत,कोणतीही आधुनिक साधने नसताना,हजारो अंध रुग्णांना पुन्हा दृष्टी प्राप्त करून दिली.हे सामाजिक कार्य प्रेरणादायी असून नव्या पिढीनेही त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा,असे मत त्यांनी व्यक्त केले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांनी डॉ.भालचंद्र यांच्या कार्याला उजाळा देत आजच्या काळात आधुनिक यंत्रणा आणि सोयीसुविधांमुळे मोतीबिंदू शस्त्रक्रिया अत्यंत सहज आणि सुरक्षित झाल्याचे सांगितले.त्यांनी उपस्थित सर्वांना मरणोत्तर नेत्रदानाबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आणि नेत्रदानासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.वैद्यकीय अधीक्षक डॉ.तानाजी लाकाळ यांनी सन २०२४-२५ या वर्षात राज्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिवच्या नेत्रविभागाने मोतीबिंदू शस्त्रक्रियेमध्ये दुसरा क्रमांक मिळवल्याची माहिती दिली. दृष्टीदिन पंधरवडा'चे औचित्य साधून डॉ.एम.के.पल्ला,डॉ.महेश पाटील आणि डॉ.ज्योती कानडे यांनी एकूण २८ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून सामाजिक बांधिलकी जपली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रौफ शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेत्रविभागातील सर्व अधिकारी,नर्सिंग स्टाफ व वर्ग-४ कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.दृष्टी ही अनमोल देणगी आहे,आणि अशा कार्यक्रमांमुळे समाजात नेत्रदान आणि नेत्रसुरक्षेबाबत जागरूकता वाढत असल्याचे स्पष्ट होत आहे.

# आता कला शाखेतूनच विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य

जून महिन्याच्या पहिल्या, दुसऱ्या आठवड्यात दहावी व बारावी बोर्डाचे निकाल जाहीर झाले. निकालानंतर साहजिकच महाविद्यालयीन पदवी प्रवेशाची, मग महाविद्यालयात आणि कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा, यावर चर्चा सुरु होते. प्रचलित दृष्टिकोनानुसार टक्केवारी चांगली असेल तर प्रवेशासाठी विज्ञान शाखा, नंतर वाणिज्य शाखा आणि शेवटीस कमी गुण असतील, इतर शाखेत प्रवेश मिळत नसेल तर अंतिम पर्याय म्हणून कला शाखेला प्राधान्य दिले जाते. परंतु ही स्थिती आता बदलत चालली आहे. बऱ्याचदा कला शाखेतील विद्यार्थी स्वत:ला कमी समजतात, या पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना योग्य कोर्स केल्यास चांगल्याप्रकारची नोकरी सहज मिळते आणि करिअरही बनू शकते, गरज आहे योग्य अशा मार्गदर्शनाची !!

**आजच्या वर्तमानकाळात संधी**

विज्ञान आणि वाणिज्य शाखेप्रमाणे अनेक उत्तमोत्तम संधी प्राप्त होत असल्याने प्रचलित दृष्टीकोन बदलत असून कला शाखेसाठी विधायक आणि सकारात्मक स्वरूपाचा आहे. इथे उल्लेख करावा लागतो, तो नावलौकिक प्राप्त प्रशासकीय अधिकारी विश्वास नांगरे पाटलांचा. त्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत ९२ टक्के मार्क घेऊन तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी इंजिनियरिंग किंवा वाणिज्य शाखेला प्रवेश न घेता कला शाखेतच प्रवेश घेतला. कठोर मेहनत आणि परिश्रमातून आज कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ते कार्यरत आहेत. डॉक्टर आणि इंजिनियरपेक्षा कितीतरी अधिक मानसन्मान त्यांना मिळालेला आहे. आमच्या शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाचे कला शाखेतील काही माजी विद्यार्थी रामराजे चांदणे (तुरुंगाधिकारी), केशव राऊत (विक्रीकर अधिकारी), अभिजित जाधवर (उपजिल्हाधिकारी), बापू बांगर (पोलीस अधीक्षक), मुस्तान



मिर्झा (पत्रकार), सागर जोशी (पत्रकार) अशी अनेक नावे गौरवाने सांगता येतात. कला शाखेतून आपली आवड, व्यवसाय आणि उपजीविकाचे साधने यात समन्वय पाहिजे. विद्यार्थ्यांना कला क्षेत्रात संशोधन, अभ्यास आणि व्यवसाय निवडीच्या अधिक संधी असून कला शाखेतून फक्त शिक्षकच होता येते, असा दृढ समज आहे. तो काही प्रमाणात खरा असला तरी मर्यादित न राहता कला शाखेतून विविध संधी आहेत.

**तयारी स्पर्धा परीक्षेतून**

प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी राजमार्ग म्हणजेच कला शाखा होय. एमपीएससी, युपीएससी तत्सम स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप पाहिले तर त्यात कला शाखेतीलच अभ्यासक्रम अधिक असल्याचे दिसून येते. तांत्रिक अथवा विशेष कार्यक्षेत्रातील नोकऱ्या वगळल्या तर बहुतांश शासकीय नोकऱ्यामध्ये कोणत्याही शाखेतील पदवीधर पात्र ठरतो. म्हणून कला शाखेत प्रवेशाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. कला शाखेत लोकप्रशासन, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, इतिहास आणि भूगोल विविध भाषा असे पर्याय विद्यार्थ्यांकडे आहेत. यापैकी आपल्या आवडीचे आणि भविष्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध असणाऱ्या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थी पदवी संपादन करू शकतात. आजच्या गतिमान खाऊजाच्या युगात प्रत्येक क्षेत्रांत छंद, आवड जोपासत असताना मोठ्या संधीपासून ते स्थानिक क्षेत्रातच रोजगार स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उपजत कलेला व्यावसायिक कसे करता येईल ? भाषा अध्ययनातून भाषांतर, वृत्तपत्र, प्रकाशन - मुद्रितशोधन, ठराविक वेळेत अधिक प्राविण्य मिळवून भवितव्य कसे सुधारू शकते? तसेच आपण ज्या ठिकाणी आहोत, त्या क्षेत्रात कला शाखेतून स्थानिक ते वैश्विक अशाप्रकारची संधी मिळू शकते.

**कलाशाखा स्वरूप**

तीन अथवा चार (नवीन शैक्षणिक धोरण-२०२० नुसार) वर्षाच्या पदवी कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करताना अनेक कौशल्य प्राप्त करता येतात. वाचन, लेखन, श्रवण, भाषण-संभाषण, चिंतन तसेच भविष्यातील रोजगाराच्या नियोजनासाठी भरपूर प्रमाणात वेळ मिळतो. म्हणजेच अन्य शाखेत जसे तांत्रिक शाखेत तासिका, टेस्ट, टिटोरिअल, प्रात्यक्षिकामुळे वेळ मिळत नाही. मात्र कला शाखेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन तासिका व्यतिरिक्त अन्य शिकवणी वर्गाची गरज भासत नाही. परिणामी पालक, विद्यार्थ्यांचा वेळ पैसा, साधन व साहित्य याची बचत होते. पालक,आई-वडिलांना आपल्या शेती-व्यवसायात मदत करत कला शाखेची पदवी संपादन करता येते.

**वर्तमान काळात अनेक संधी**

जर तुम्हाला साहित्य क्षेत्रात करियर करावयाचे झाल्यास भाषा विषयात स्पेशलायझेशन करू शकता. ज्या माध्यमातून वृत्तपत्रीय लिखाण, कथा, पटकथा, मालिका लेखन कादंबरी,अन्य भाषेतील भाषांतर, चित्रपटातील संवाद,गीत लेखन, कविता,नाटक अशा अनेकविध क्षेत्रांत आपण यशस्वी होऊ शकतो. सध्या सामाजिक, राजकीय,सांस्कृतिक,व्यावसायिक, कौटुंबिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी होत असतात. अशा ठिकाणी आयोजकाची गरज भासत असते. अशावेळी एक करियर म्हणून पर्याय उपलब्ध होऊ शकतो. एकूणच कला शाखेतील करिअरच्या संधी भारतीय प्रशासकीय सेवा: एम.पी. एस.सी.,यू.पी.एस.सी., आय.आर. एस., आय.एफ.एस., आय.पी.एस, एस.टी.आय., मंत्रालय लिपिक, कर सहायक, तहसीलदार, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, मुख्याधिकारी, उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधिक्षक इ. ग्रामीण विकास क्षेत्र: ग्रामसेवक, तलाठी, कृषीसेवक, वनरक्षक, पाटबंधारे, समाजकल्याण विभाग, देश सेवा : लष्करी अधिकारी, आर्मी, पोलीस भरती, अग्नीशामक दल, बीएसएफ,एसआरपीएफ, सीआरपीएफ, एन.डी.आर.एफ., सी.आय.एस.एफ, शैक्षणिक क्षेत्रात- प्राथमिक शिक्षक, डी.टी. एड. टीईटी, माध्यमिक शिक्षक, बी.एड., सी.ई. टी., प्राध्यापक:कनिष्ठ, वरिष्ठ प्राध्यापक, बी.ए.बी.एड,. एम.ए.बी.एड., एनईटी, एसईटी, कायदेतज्ज्ञ : एल.एल.बी., एल.एल.एम., न्यायाधीश, पत्रकारिता: जर्नालिझम, प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक मिडीया, सोशल मिडीया नेटवर्किंग, पत्रकार, निवेदक. कला, पर्यटन : फाइन आर्ट, ॲनिमेशन, ग्राफिक्स, व्यंग्यचित्रकार, बी.एस.डब्लू, एम.एस. डब्लू: शासकीय, निमशासकीय, खाजगी कंपनी क्षेत्र. समाजसेवा : एन.जी.ओ.सोशल वर्कर, समुपदेशक, समाजकल्याण, बालकल्याण, महिला समुपदेशन. जाहिरात क्षेत्र : वृत्तपत्र, दूरदर्शन, फॅशन डिझायनिंग, ज्वेलरी डिझायनिंग, इंटेरियर डिझायनिंग इ. ग्रंथालय : बी.लिब.एम.लिब. इ. क्षेत्रात करिअर - नोकरीच्या संधी तर आहेत. त्याबरोबरच एखाद्या क्षेत्रात उत्तम स्वतंत्र लघुउद्योग व्यवसायही करता येतो. त्यासाठी सखोल ज्ञान, कष्ट आणि संयमाची आवश्यकता आहे. थोडक्यात आपल्याला काय व्हायचं ? यापेक्षा आपण काय करायचं? म्हणजेच अगोदर ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे. कला शाखेकडे विद्यार्थी वळू शकेल, यासाठी प्राध्यापकांनीही विद्यापीठीय अभ्यासक्रमांपुरते मर्यादित न राहता, रुक्ष अध्यापनात बदल करून, प्रझेंटेशन, इंटरव्ह्यू मेथड,गूगल मिट,झूम,ऑनलाईन टीचिंग,ग्रुप डिस्कशन अशा आधुनिक कौशल्याधारित पद्धतीची कास धरावी, दैनंदिन व्यवहाराशी संबधित रोजगाराच्या संधी विषयी मार्गदर्शन करावे, एकूणच कमी गुण तर कला शाखा हे चित्र बदलून आजच्या काळाची गरज- कला शाखा हा उत्तम पर्याय असून जीवनाला दिशा देणारा राजमार्ग ठरू शकेल.

प्रा.डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी
(मराठी विभाग) शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
मो.९४२०९५८६९९

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

CMYK

03

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संमिश्र

बुधवार दि.11 जून 2025

# कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातील टप्पा क्रमांक सहाच्या कामाचा प्राधान्यक्रमात समावेश करून निविदा प्रक्रिया तातडीने राबवा

## सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची जलसंपदा मंत्र्यांकडे मागणी



आरंभ मराठी | धाराशिव

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातील टप्पा क्रमांक सहा च्या कामाचा प्राधान्यक्रमात समावेश करून निविदा प्रक्रिया तातडीने राबवा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मराठवाड्याचा दुष्काळ हटवण्याच्या दृष्टीने कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प हा मराठवाड्यासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. राज्य शासनाने २३ ऑगस्ट २००७ रोजी या प्रकल्पाला मान्यता दिलेली आहे. आतापर्यंत पाच टप्प्याचे काम सुरू असून, तुळजापूर तालुक्यातील रामदाऱ्यापर्यंत पाणी येणार आहे. यासंदर्भात माहिती अधिकारात मंत्रालयातून अनिल जगताप यांनी माहिती घेतली असता त्यात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. अत्यंत महत्त्वाचा असणारा सहावा टप्पा तुळजापूर, लोहारा उमरगा या तीन तालुक्यासाठी आहे. त्याचा अद्यापही प्राधान्यक्रमात समावेश नसून टेंडर प्रक्रिया तर दूरच आहे. सहाव्या टप्प्यात तुळजापूर तालुक्यातून लोहारा तालुक्यातील माळेगाव, पांढरी, जेवळी येथील तलावातून उमरगा तालुक्यातील तुरोरीपर्यंत पाणी नेण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याचा प्राधान्यक्रमात समावेश करून निविदा प्रक्रिया राबवून हा टप्पा पूर्ण करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधापर्यंत पाणी पोहोचवावे अशी मागणी अनिल जगताप यांनी केली आहे. दरसूचीतील बदलामुळे ज्यादा दराची निविदा स्वीकृत केल्याने, भूसंपादन किमतीतील वाढ, अपुऱ्या तरतुदीमुळे तसेच इतर कारणामुळे झालेली घट, नवीन घटकाचा समावेश केल्याने तसेच अनुषंगिक खर्च इत्यादीमुळे प्रकल्पाच्या खर्चात लक्षणीय अशी वाढ झालेली आहे. सुरुवातीला २००७ मध्ये या प्रकल्पाचा खर्च केवळ २३८२ कोटी ५० लाख इतकाच होता. मात्र १० नोव्हेंबर २०२२ रोजी द्वितीय प्रशासकीय मान्यता देण्यात आली त्यात हा खर्च ११ हजार ७२६ कोटी ९१ लाख इतका दाखवण्यात आलेला आहे.

### प्राधान्यक्रमात घेणे म्हणजे काय

एखाद्या आर्थिक वर्षात जलसंपदा विभागाची कुठली कामे करायची हे ठरविले जाते व त्याला प्राधान्यक्रम दिला जातो. त्यानुसार ते काम प्राधान्यक्रमात घेऊन त्याची निविदा प्रक्रिया राबवून आर्थिक तरतूद केली जाते. त्यानुसार टप्पा क्रमांक सहाचा प्राधान्यक्रमात समावेश करून निविदा प्रक्रिया राबवावी अशी मागणी केली आहे. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाला २३ ऑगस्ट २००७ रोजी प्रत्यक्ष मान्यता दिली होती. आत्तापर्यंत केवळ पाच टप्प्याचेच काम सुरू आहे. याला जवळपास १८ वर्षे पूर्ण होत आहेत. सहाव्या टप्प्याचे काम प्राधान्यक्रम समावेश करून निविदा प्रक्रिया राबवून पूर्ण व्हायला किती वर्ष लागतील याचा विचार मात्र आता धाराशिव जिल्ह्यातील बळीराजा करत आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या कालखंडात जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी टप्पा क्रमांक एक ते पाच ची कामे प्राधान्य क्रमात घेतल्याने व त्याला नंतर आर्थिक तरतूद झाल्याने ती कामे झालेली आज दिसत आहेत.

### कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाची थोडक्यात माहिती





- २३ ऑगस्ट २००७ रोजी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या मान्यतेने एक विशेष बाब म्हणून या प्रकल्पाला मान्यता दिली. त्यावेळी या प्रकल्पाचा खर्च २३८२ कोटी इतका होता.
- २७ ऑगस्ट २००९ रोजी प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता व्यंकटराव विश्वनाथ गायकवाड सचिव जलसंपदा यांच्या स्वाक्षरीने देण्यात आली.
- त्यावेळी प्रकल्प खर्च ४२१० कोटी ५९ लाख रुपये इतका होता. द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता १० नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसाद नार्वेकर उपसचिव महाराष्ट्र शासन यांच्या स्वाक्षरीने देण्यात आली.
- प्रकल्पाचा खर्च ११७२६ कोटी ९१ लाख इतका झाला आहे.
- सदर प्रकल्प ७ टीएमसी पाण्यासाठी असून धाराशिव जिल्ह्यातील भूम, परंडा, वाशी, कळंब, तुळजापूर, लोहारा, उमरगा या तालुक्यासाठी तर बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यासाठी आहे.
- या प्रकल्पामुळे धाराशिव जिल्ह्यातील २५ हजार ७९८ हेक्टर तर बीड जिल्ह्यातील ८ हजार १४७ असे एकूण ३३ हजार ९४५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.
- दरसूचीचे अवलोकन केले असता, २००७ पासून आत्तापर्यंत भूसंपादन, बांधकाम, विमचक, पूल, इमारती, मातीकाम, वृक्षारोपण, दळण वळण, पर्यावरण यात सहा ते दहा पटीने वाढ झालेली आहे.

# प्रा. सोमनाथ लांडगे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय कार्य गौरव पुरस्कार जाहीर

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव येथील शैक्षणिक व सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले श्री साई श्रध्दा एज्युकेशन नीट ऑनलाईन टेस्ट सीरिजचे संचालक तसेच बील गेट्स जुनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा. सोमनाथ लांडगे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय कार्य गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अमरावती येथील अंबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने प्रा. सोमनाथ लांडगे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून दिनांक ११ जून २०२५ रोजी क्षितिज पॅलेस, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक, अमरावती येथे समारंभ पुर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचे पत्र संस्थेच्या सचिव माधुरीताई चव्हाण यांनी दिले आहे. याच कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान होणार असून ''मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीत पालकांचे योगदान '' या विषयावर प्रा. सोमनाथ लांडगे यांचे व्याख्यान होणार आहे. दिवसभर चालणाऱ्या कार्यक्रमात अनेक मान्यवर शैक्षणिक विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमास खा. बळवंत वानखेडे, आ. सुलभाताई खोडके, लेडी गव्हर्नर कमलताई गवई, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रशांत डावरे, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातील जनसंपर्क अधिकारी डॉ. मनिष गवई, साहित्यिक विष्णुसिंह सोळंकी, प्राचार्य दिलीप काळे, अतुल गोळे व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक क्षेत्रात सतत नवनवीन प्रयोग करून मेडिकल कॉलेज प्रवेश पूर्व परिक्षा अर्थात नीट परीक्षेत आपला नवीन पॅटर्न तयार करून अनेक गोरगरीब व वंचित मुला-मुलींना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यात यशस्वी झालेले व धाराशिव शहरात श्री साई श्रध्दा एज्युकेशन मार्फत अत्यंत कमी फीस मध्ये मुलींचे वसतीगृह, अर्थिक अडचणीत असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या मुलींना शैक्षणिक फीस भरण्यास मदत असे अनेक शैक्षणिक काम करत असलेल्या प्रा. सोमनाथ लांडगे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# मुरुड परिसरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

## महिलांनी पतीच्या दीर्घायुष्यासाठी तसेच जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून केली मनोभावे प्रार्थना



आरंभ मराठी | मुरुड

ज्येष्ठ पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर, महाराष्ट्रासह देशभरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. मुरुड येथेही महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून वडाच्या झाडाची पूजा केली आणि आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी तसेच जन्मोजन्मी हाच पती मिळावा अशी मनोभावे प्रार्थना केली. मुरुड येथील विविध भागामध्ये असलेल्या वडाच्या झाडास पूजा व प्रदक्षिणा घालत हर्ष उल्हासात वटपौर्णिमा साजरी केली. वटपौर्णिमा हा सण भारतीय संस्कृतीतील पती-पत्नीच्या अतूट नात्याचे प्रतीक आहे. पौराणिक कथेनुसार, सत्यवान-सावित्रीची कथा या सणाशी जोडलेली आहे. सावित्रीने यमराजाकडून आपल्या पतीचे, सत्यवानाचे प्राण परत आणले होते. याच घटनेच्या स्मरणार्थ विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या उत्तम आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी आणि संसार सुखासाठी वडाच्या झाडाची पूजा करतात.

### पूजेचे स्वरूप

मुरुड शहरातील महिलांनी सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वडाच्या झाडाजवळ गर्दी केली होती. त्यांनी पारंपरिक पद्धतीने वडाच्या झाडाला सूत गुंडाळले, हळद-कुंकू वाहिले, फळे आणि मिठाई अर्पण केली. त्यानंतर 'जन्मोजन्मी हाच पती मिळावा' अशी प्रार्थना करत त्यांनी वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घातल्या. अनेक महिलांनी यावेळी ''अखंड सौभाग्यवती भव'' असा आशीर्वाद मिळावा यासाठी मनोभावे पूजा केली.

### सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व

वटपौर्णिमा केवळ एक धार्मिक सण नसून, तो आपल्या संस्कृतीतील कुटुंब आणि नात्यांना महत्त्व देतो. हा सण महिलांना एकत्र येण्याची, आपल्या परंपरा जपण्याची आणि सामाजिक सलोखा वाढवण्याची संधी देतो. या दिवशी महिला आपल्या पतीबद्दलचे प्रेम आणि आदर व्यक्त करतात, जे भारतीय संस्कृतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. एकंदरीत वटपौर्णिमेच्या निमित्ताने महिलांनी आपल्या पारंपरिक श्रद्धा आणि पतीवरील प्रेमाचे अनोखे प्रदर्शन केले आणि हर्ष उल्हासात वटपौर्णिमा सण साजरा केला.

# मुरुम शहरात वटसावित्री पौर्णिमेनिमित्त महिलांची मनोभावे पूजा

## वडाच्या वृक्षाभोवती फिरून सासरच्या सुखासाठी प्रार्थना



आरंभ मराठी | मुरुम

मुरुम शहरात वटसावित्री म्हणजेच वटपौर्णिमेच्या दिवशी मंगळवारी (ता.१० जुन) रोजी मंगलमय वातावरणात महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा केला. शहरातील विविध भागांतील वडाच्या झाडांभोवती महिलांनी व्रतस्थ होऊन सात फेऱ्या घालून आपल्या पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना केली. या दिवशी पहाटेपासूनच महिलांनी पारंपरिक साड्या, नथ, कुंकू-हळद, हिरव्या बांगड्या अशा पारंपरिक वेषात सजून उत्साहात सहभाग घेतला. वटवृक्षाच्या पायथ्याशी पुजा करून फळं, फूलं, सुगंधी धूप, पंचपक्वान्न, फळांचे नैवेद्य अर्पण करून सविता मातेची कथा ऐकण्यात आली. शहरातील किसान चौक, नेहरूनगर, बसस्थानक परिसर, यशवंत नगर, संभाजीनगर, नागोबा गल्ली, तसेच नगरपालिका परिसरातील वटवृक्षाजवळ महिला एकत्र आल्या होत्या. काही ठिकाणी सामूहिक पूजेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी आपल्या नवऱ्याच्या आरोग्य, सुख, समृद्धीसाठी व्रत केल्याचे सांगितले. वडाचे पूजन करताना महिलांनी ''सत्यवानाच्या सावित्रीच्या पवित्र व्रतानं पतीला दीर्घायुष्य लाभो'' अशी प्रार्थना केली. यावेळी वातावरण भक्तिमय होते. काही ठिकाणी महिलांनी पारंपरिक गाणी व म्हणी म्हणत एकत्र पूजन केले. वटपौर्णिमा हा सण स्त्रियांच्या निष्ठा, प्रेम आणि दृढ संकल्पाचे प्रतीक मानला जातो. सावित्रीने आपल्या पतीच्या प्राणासाठी यमधर्माशी संघर्ष करून त्याला पुन्हा प्राप्त केले, ही पौराणिक कथा या दिवशी आठवली जाते. एकंदरीतच मुरुम शहरात वटसावित्री सण अत्यंत भक्तिभावाने, उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून आले.


# घरकुल योजनेतील एकही लाभार्थी वंचित राहणार नाही,याची दक्षता घ्या

## खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रशासनाला सूचना



आरंभ मराठी | धाराशिव

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या निवडीसाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत एकूण ८१,०२७ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी अशी सूचना खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केली. बैठकीला खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्यासह आ. कैलास पाटील, आ. प्रवीण स्वामी यांची ऑनलाईन उपस्थिती होती. जिल्ह्यातील लाभार्थींचे सर्वेक्षण सुरु असून, तालुकानिहाय पात्र कुटुंब पुढीलप्रमाणे आहे. धाराशिव १८,०००, तुळजापूर १६,५५२, कळंब ११,६५२, उमरगा १०,३३५, परांडा ९,३८६, भूम ६,३५१, वाशी ४,५७६, लोहारा ४,१९८ एकूण ८१,०२७ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्वेक्षणासाठी १८ जून २०२५ ही अंतिम मुदत आहे. यापुढे मुदतवाढ कोणत्याही परिस्थितीत मिळणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यासंदर्भात प्रत्येक ग्राम पंचायतीने विशेष ग्रामसभा आयोजित करून लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत करावी, असेही आदेश देण्यात आले आहेत. शहरी भागातील पात्र लाभार्थींना या योजनेंतर्गत घरकुलासाठी २ लाख ४० हजार रुपये तर ग्रामीण भागातील पात्र लाभार्थ्यांना २ लाख १० हजार अनुदान



देण्यात येत असून, पात्र लाभार्थींनी या योजनेचा लाभ घ्यावा असे अवाहन देखील करण्यात आले आहे.ज्या कुटुंबाकडे घरकुलासाठी जागा उपलब्ध नाही, अशा पात्र कुटुंबांचाही सर्वे करण्यात यावा अशी सूचना करण्यात आली आहे. प्रक्रियेची मुख्य जबाबदारी ग्रामसेवकांवर असेल असे बैठकीदरम्यान निश्चीत करण्यात आले. प्रशासनाने सर्व संबंधित यंत्रणांना या अभियानात पूर्ण क्षमतेने सहभागी होण्याचे आवाहन केले असून, लाभार्थ्यांच्या निवडीत पारदर्शकता आणि अचूकता राखण्यावर भर देण्यात आला आहे. या बैठकीसाठी जिल्हा परषिदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, विलास जाधव, प्रकल्प संचालक, शाम गोडभरले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं), मेघराज पवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, तसेच सर्व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

# शिवसेना ठाकरे गटाच्या नितीन शेरखानेंसह कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

आरंभ मराठी | धाराशिव



राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष, शिवसेना ठाकरे गटाचे नेते नितीन शेरखाने यांनी समर्थकांसह मंगळवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपा कार्यालयात आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.यावेळी नितीन भोसले, नेताजी आबा पाटील, अमित शिंदे, राजसिंहा राजेनिंबाळकर, युवराज नळे, अक्षय ढोबळे, सनी पवार यांच्यासह शहरातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अनिल शेरखाने, देविदास शेरखाने, संपत शेरखाने, पद्माकर शेरखाने, ॲड. गणपत कांबळे, साहेबराव शेरखाने, शंतीनाथ शेरखाने, नवनाथ कांबळे, अविनाश शेरखाने, प्रमोद शेरखाने, कुणाल शेरखाने, सुधाकर केसकर, मोनु सुडके, पप्पू माळी, किरण शेरखाने, दादाराव शेरखाने, तुकाराम वाघमारे, बबन वाघमारे, प्रेम शेरखाने, प्रतीक शेरखाने, डॉ. सत्यविजय शेरखाने, अनिकेत शेरखाने, किशोर वाघमारे, राजू सातपुते, दीपक नाईकनवरे, पांडुरंग सुतार, प्रशांत कांबळे, शेख फारुख, सुनील शेरखाने, संजय शेरखाने, सचिन लोंढे, संदीप गिराम, अमोल लोहार, पृथ्वीराज पाटील, हनुमंत गायकवाड, सुधाकर शेरखाने, रणजित उकिरडे, अनंत काळे, दत्ता पवार, राज सुरवसे, संदीप पवार, अक्षय गाडे, शिवम शेरखाने, योगेश सुदके, सुनील सुदके, पांडुरंग कांबळे, नामदेव वाघमारे, निलेश वाघमारे, राजेंद्र रोकडे, संपत सुतार, विशाल कांबळे, मच्छिंद्र कांबळी, अयुब शेख, दीपक पटे, बापू वाघमारे, राज कांबळे, सुदेश, विर्गत, खंडू शिंदे, विजय कांबळे, संतोष वाघमारे, प्रभाकर जाधव, सचिन पवार, सागर शेरखाने यांनीही भाजपात पक्ष प्रवेश केला.

# पळसप येथे वटपौर्णिमा सणाचा उत्साह;महिलांनी केली मनोभावे पूजा

आरंभ मराठी | पळसप

प्राचीन काळापासून ग्रामीण परंपरा जपणारा पती पत्नीच्या नात्याचे महत्त्व जपणारा सण म्हणजे वटपौर्णिमा. ज्येष्ठ महिन्यात हा सण साजरा केला जातो. विवाहित महिला वडाच्या वृक्षाला दोरीच्या धाग्याने प्रदक्षिणा घालून आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाची पूजा करतात. जन्मोजन्मी हाच पती मिळावा अशी परंपरा असल्याचे सांगण्यात येते. आजही ग्रामीण भागात ही परंपरा जोपासली जाते. वडाच्या झाडाची पूजा केल्याने वडाच्या झाडाला जसे दीर्घायुष्य आहे. तसेच दीर्घायुष्य आपल्या पतीला आणि कुटूंबाला लाभावे यासाठी विवाहित महिला वटपौर्णिमेच्या सणाला महत्त्व देतात. पळसप मध्ये सकाळी अकरा पासूनच महिलांनी गावातील परंपरेने पुजत आलेल्या वडाच्या वृक्षाला प्रदक्षिणा घालण्यासाठी आणि वडाच्या झाडाची पूजा करण्यासाठी गावात गर्दी केली होती. वटपौर्णिमेनिमित्त विविध पारंपरिक वेशभूषा आणि दागिने परिधान करून सर्व जाती धर्मातील महिला एकत्र येऊन आपल्या सुखी कुटुंबासाठी वटवृक्षाची पूजा करताना दिसून आल्या. गावातील महिलांमध्ये या सणाचा वेगळाच उत्साह पाहायला मिळाला.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव.

बुधवार दि.11 जून 2025

# पुढील पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांची पेरणीसाठी धावपळ

# खते आणि बियाणे घेऊन शेतकऱ्यांची चाड्यावर मूठ

## यावर्षीही सोयाबीन पिकाकडे शेतकऱ्यांचा ओढा

सुभाष कुलकर्णी | आरंभ मराठी

**तेर –पुढील पावसाच्या भरवशावर खरीप हंगामातील सोयाबीन या नगदी पिकाची पेरणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी धावपळ चालू केली आहे. सध्या सर्वत्र बळीराजाने पेरणीच्या कामाला झोकून दिले आहे. पैशांची जुळवाजुळव करून बळीराजाने खते आणि बियाणे खरेदी करून चाड्यावर मूठ धरली आहे. मृग नक्षत्रात भरपूर पाऊस पडेल आणि पेरलेले संपूर्ण बियाणे उगवून शिवार हिरवाईने नटेल या आशेवर बळीराजा पेरणीत मग्न झाल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.**

गेल्या अनेक वर्षानंतर पहिल्यांदाच में महिन्यात तेर महसूल मंडळात २१५ मि.मी पाऊस बरसल्याने शेतात पेरणीयोग्य ओलावा निर्माण झाला आहे. पुढच्या पावसाच्या भरवशावर आता शेतकऱ्यांनी पेरणीची वाट धरली आहे.मे महिन्यात पेरणीयोग्य पाऊस झाल्याने व मृग नक्षत्राच्या पहिल्याच दिवशी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांनी पेरणी करण्यासाठी धावपळ सुरू केली आहे. तेर व पंचक्रोशीत खरीप हंगामातील सोयाबीनचे प्रमुख पीक घेतले जाते. सोयाबीन हे नगदी पीक असल्याने शेतकरी या पिकाकडे वळला आहे. सोयाबीन सोबतच तूर, मुग व उडीद ही दुय्यम पिके या भागात घेतली जातात. एकूण लागवडयोग्य क्षेत्रापैकी ८० टक्के क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी होण्याची शक्यता आहे. गेल्या हंगामात ऐन सोयाबीन काढण्याच्या वेळी परतीच्या पावसाने कहर केल्याने बहुतांश शेतकऱ्यांचे सोयाबीन पाण्यात गेले तर कांहीं जणाचे सोयाबीनच्या ढिगाऱ्याला कोंब फुटले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले होते. महागड्या सोयाबीन बियाण्यांच्या बॅगा खरेदी करणे परवडणारे नसल्याने बहुतांश शेतकऱ्यांचा घरगुती बियाणाकडे कल दिसून येत आहे.



### प्रयोगशील शेतकऱ्यांचा नवीन वाण पेरण्याकडे कल

दरवर्षी सोयाबीनच्या नवनवीन विकसित जाती बाजारात येतात. प्रयोगशील शेतकऱ्यांकडून कोणती जात चांगली आहे याचा अभ्यास करून नवनवीन जातीचे सोयाबीन पेरण्याला पसंती दिली जाते. यावर्षी ९९२, ७५३, ७२५, ३३५ या वाणांना जास्त मागणी असल्याचे दिसते. पाऊसकाळ चांगला झाला असला तरी पेरणी झाल्यानंतर बी उगवून येईपर्यंत शेतकऱ्यांना काळजी लागलेली असते.

### ट्रॅक्टरद्वारे पेरणीला पसंती

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही ट्रॅंक्टरच्या सहाय्याने मशागत करण्यासाठी पसंती दिली आहे .पशूधन कमी झाल्यामुळे छोट्या ट्रॅंक्टरवर पेरणी करण्याचा मार्ग शेतकऱ्यांनी निवडला आहे. त्यामुळे पेरणी लवकर उरकत आहे. ज्या ठिकाणी वापसा झाला तिथे शेतकरी पेरणी करण्यासाठी धावपळ करीत आहेत. मृग नक्षत्रात पेरणी झाल्यास उत्पादन चांगले निघते असा शेतकऱ्यांचा आजपर्यंतचा अनुभव आहे. मे महिन्यात पाऊस पडल्यामुळे यंदा जवळपास सर्व शेतकऱ्यांच्या पेरण्या मृग नक्षत्रात होऊन जातील असा अंदाज आहे.

# वटपौर्णिमा केवळ श्रद्धेचा विषय नसून त्यामागे विज्ञान

## प्राचार्य डॉ संजय अस्वले यांचे प्रतिपादन



आरंभ मराठी | उमरगा

वटपौर्णिमा हा सण ज्येष्ठ पौर्णिमेला साजरा होत असून यामागे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व आहे. पौराणिक कथेनुसार, वटपौर्णिमेच्या दिवशी सावित्रीची निष्ठा, श्रद्धा आणि धैर्यामुळे यमराज प्रभावित झाले आणि सत्यवानाला जीवनदान दिले. वडाच्या झाडाला त्रिदेवांचे म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे रूप मानले जाते. एवढेच नसून, त्यामागे वैज्ञानिक दृष्टिकोन सुद्धा आहे. वटपौर्णिमा हा सण केवळ श्रद्धेचा विषय नसून त्यामागे आरोग्य, पर्यावरण, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांचे सुसंगत विज्ञान दडलेले आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ संजय अस्वले याप्रसंगी केले. उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय ग्रीन क्लब अंतर्गत वटपौर्णिमेचे औचित्य साधून वटवृक्षाचे रोपण आणि पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले. वड (वटवृक्ष) हा २४ तास ऑक्सिजन सोडतो (रात्रीही), जे इतर झाडांमध्ये विरळच असते. म्हणून त्याच्या झाडाखाली बसणे हे प्राणवायू मिळवण्याच्या दृष्टीने लाभदायक असते. वडाच्या सालीपासून, दूध (), पाने, पारंब्या आणि मुळांपासून अनेक आयुर्वेदीक औषधे तयार केली जातात. स्त्रियांचा वडाच्या झाडाभोवती सूत गुंडाळून प्रदक्षिणा घालताना जमिनीशी थेट संपर्क होत असल्याने नकारात्मक ऊर्जा कमी होते आणि मन:शांती मिळते आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. महिलांचा एकत्र येऊन पूजा, कथा सांगणं, संवाद साधणं हे सुद्धा समूह मनोविज्ञान सुधारण्यास मदत करतं. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करून महाविद्यालयीन परिसरात वटवृक्षरोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, डॉ विनोद देवरकर, डॉ अशोक पदमपल्ले, डॉ धनंजय मेनकुदळे, सतीश जगताप, अनिल तुंगे आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तुळजापूर शहरातील पुजारी नगर येथे वडाचे रोप लावून वटपौर्णिमा साजरी

आरंभ मराठी | तुळजापूर

सर्वात विशाल आणि बाराही महिने सदाहरित असलेला असा वृक्ष म्हणजे वडाचे झाड आहे. ज्याची सर्वत्र वटपौर्णिमेला पूजा केली जाते. प्रदूषण देखील शोषून घेतात. असे उपयुक्त वडाचे झाड असल्याने पुजारी नगर येथे खुल्या जागेत शुभांगी गणेश पुजारी यांच्या पुढाकारातुन वडाचे रोप लावून खऱ्या अर्थाने वटपौर्णिमा साजरी करण्यात आली. पुजारी नगर सोसायटीच्या महिलांच्या या वर्षभरात शकडो वृक्ष सोसायटीच्या खुल्या भागात लावण्याचा संकल्प शुभांगी गणेश पुजारी यावेळी केला. याप्रसंगी मोठ्या



संख्येने पुजारी नगर सोसायटीतील महिलांची उपस्थिती होती. वड हे दाट सावली देणारे झाड तसेच सर्वात जास्त ऑक्सिजन देणारे वडाचे झाड आहे. आरोग्यासाठी उपयुक्त असणारा वटवृक्ष आहे. पावसाळ्यात वडाचे झाड पावसाचे पाणी धरून ठेवते. त्यामुळे उष्णता कमी होण्यास मदत मिळते. नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावे, याच विचाराची जोपासना करत परिसरात जास्तीत जास्त वृक्षांची लागवड केली जाणार आहे.

### मोकळ्या जागेत एकतरी झाड लावा

वटपौर्णिमेची आख्यायिका पाहिली तर आरोग्यासाठी वडाचे झाड किती महत्वाचे आहे हे लक्षात येते. विशाल असा वटवृक्ष दाट सावली देतो. सर्वात जास्त ऑक्सिजन वडाच्या झाडांमुळे मिळतो. याशिवाय अनेक प्रकारच्या जीवजंतूला आधार देणारे हे झाड आहे. घरासमोर वटवृक्ष लावू शकत नाही. मात्र कॉलनीतील मंदिर परिसरात, गार्डनमध्ये किंवा ज्या ठिकाणी भरपूर जागा मोकळी असते त्या ठिकाणी वडाचे एक तरी झाड लावले पाहिजे.

– शुभांगी पुजारी तुळजापूर.

# चोरीच्या गुन्ह्यात ड्रायव्हरच आरोपी; आठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी | भूम

पंधरा दिवसांपूर्वी दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी गाडीचा ड्रायव्हरच निघाला असून, पंधरा दिवसात पोलिसांनी तपास करत आरोपीकडून तब्बल आठ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, दिनांक २९ मे रोजी भुम शहरातील हॉटेल शिवनेरी समोरून फिर्यादी अनिल पांडुरंग बेदरे (रा. जामखेड) यांच्या गाडीतून सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण ९ लाख ६२ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता. याबाबत भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी फिर्यादीने त्यांचा ड्रायव्हर रवींद्र परदेशी (रा. जामखेड) याच्यावर संशय असल्याचे सांगितले होते. त्या ड्रायव्हरला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने त्याच्या अन्य एका साथीदाराचे नाव चौकशी दरम्यान सांगितले. प्राप्त माहितीवरून आरोपी नामे चंद्रकांत चव्हाण (रा. सावरगाव ता. जामखेड) याला सावरगांव येथून ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी करून नमूद दोन आरोपीकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेले एकूण ६५ ग्रॅम सोने, ७५ ग्रॅम चांदी आणि रोख रक्कम १,५०,००० रुपये असा एकूण ०८,१२,००० रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक सरोदे पुढील तपास करीत आहेत. ही कामगिरी पोलीस अधीक्षक धाराशिव श्रीमती रितु खोखर, पोलीस अधीक्षक धाराशिव श्रीमती शफकत आमना अप्पर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी पोस्टे भूम, पोलीस निरीक्षक विनोद इज्रपवार, सपोनि सुदर्शन कासार स्था गुन्हे शाखा पोलीस उपनिरीक्षक संजय जराड, प्रल्हाद सरोदे पोस्टे भुम पोलीस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फरहान पठाण, पो ना संदेश क्षिरसागर, चापोहे अरविंद डोके, पोशी चालक रत्नदीप डोंगरे यांनी संयुक्तपणे केली.

# महाडीबीटीवरील बियाण्यांमध्ये घोटाळा; शिवसेनेकडून कारवाईची मागणी

आरंभ मराठी | तुळजापूर

जिल्ह्यातील महाडीबीटी वरील योजनेतील ऑनलाईन बियाणे वाटपामध्ये घोटाळा झाला असून याबाबत तात्काळ चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी तुळजापूर शिवसेना तालुकाध्यक्ष अमोल जाधव यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे केली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा पोषण अभियान व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत शंभर टक्के अनुदानावर हेक्टरी ७५ किलो बियाणे देण्याची योजना सध्या राबवली जात आहे. मात्र प्रत्यक्षात एका हेक्टरला ७५ किलो बियाणे न देता ज्या दुकानात २२ किलोची बॅग आहे त्या ठिकाणी ६६ किलो बियाणे हेक्टरी शेतकऱ्यांना मिळाले आहे. तसेच ज्या ठिकाणी ३० किलो ची बॅग आहे त्या ठिकाणी ६० किलो बियाणे मिळाले आहे. यामुळे शेतकऱ्यांना योजनेत अंतर्भूत असलेल्या बियाण्यापेक्षा कमी बियाणे मिळाले आहे. या योजनेत कृषी सेवा केंद्र चालकांकडूनही लूट करण्यात आली आहे. यामध्ये कृषी अधिकारी देखील सामील असल्याचा संशय आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून याबाबत कारवाई करावी. कारवाई न केल्यास लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्याचा इशारा जाधव यांनी दिला आहे.

# पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते उद्या शिवसेना संपर्क कार्यालयाचे उद्घाटन



आरंभ मराठी | कळंब

परिवहनमंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक गुरूवारी कळंब दौऱ्यावर येत आहेत. दुपारी १२:३० वाजता शहरातील छत्रपती संभाजीराजे चौक येथील शिवसेना संपर्क कार्यालयाचे उद्घाटन मंत्री सरनाईक यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी माजी खासदार तथा संपर्क प्रमुख रविंद्र गायकवाड, उपनेते नेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले, सहसंपर्क प्रमुख भगवान देवकते, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिवाजी कापसे यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, विभाग प्रमुख, आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, आजी माजी पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, ग्रामपंचायत सरपंच सदस्य व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे अवाहन शिवसेनेचे नेते अजित पिंगळे, उपजिल्हा प्रमुख आनंत वाघमारे, तालुका प्रमुख लक्ष्मीकांत हुलजुते व शहर प्रमुख गजानन चोंदे यांनी केले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या मनमानीमुळे मेंढा येथील प्रवाशांचे हाल; प्रवाशांना गावात न सोडता पाटीवरच सोडले जात असल्याची तक्रार

आरंभ मराठी | तेर

धाराशिव तालुक्यातील मेंढा येथे धाराशिव ते औसा हा रस्ता पूर्णता उखडल्यामुळे एसटी बसेस मध्येच बंद करण्यात आल्या होत्या. परंतु, प्रवाशांची हेळसांड होत असल्यामुळे पुन्हा बसेस चालू करण्यात आल्या. काही बसेस मेंढ्यात येत होत्या व काही बसेस पाडोळी येथे थांबत होत्या. असा मनमानी कारभार एसटीचे चालक वाहक करत आहेत याची तक्रार सरपंच नामदेव माळी यांनी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्याकडे केले होती. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे धाराशिव जिल्ह्याचे पालकत्व आहे. त्यांच्याच जिल्ह्यात प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.अनेक वेळा पत्र देऊनही महामंडळाचे अधिकारी दखल घेत नव्हते. यामुळे सरपंच नामदेव माळी यांना याविषयी माहिती दिली. भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनीही अधिकाऱ्यांना मेंढा गावात बसेस नेण्याच्या सुचना दिल्या होत्या. परंतु काही चालक आणि वाहक मेंढा गावात बस न आणता मेंढा पाटीवर सोडतात. यामुळे प्रवाशांची हेळसांड होत आहे. यामुळे प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एसटी महामंडळचा मनमानी कारभार सुरू असल्याने जर एखादी दुर्घटना घडली तर याला सर्वस्वी जबाबदार महामंडळाचे अधिकारी जबाबदार राहतील असा इशारा सरपंचा नामदेव माळी यांनी दिला आहे.

# भव्य वृक्षारोपणाची पायाभरणी; आळणीच्या रोपवाटिकेत प्रात्यक्षिक

## हरित धाराशिवसाठी जिल्हाधिकाऱ्यांसह विविध संस्था,संघटनांचा पुढाकार, मियावाकी पद्धतीने वृक्ष लागवड

आरंभ मराठी | धाराशिव

हरित धाराशिव अभियानांतर्गत येत्या १९ जुलै रोजी १५ लाख वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. त्याआधी मंगळवारी (दि.१०) सामाजिक वनीकरण विभागाच्या आळणी येथील रोपवाटिकेत ४ गुंठे जमिनीवर मियावाकी पद्धतीने वृक्ष लागवडीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. या प्रात्यक्षिकात साग, सीताफळ, आवळा, कोरफळ, वड, कडुनिंब, सावर, पिंपळ, चिंच, पेरू, उंबर, फणस, रिठा, सिसव, मोगरा, गुलाब, बेल, अर्जुन, मोहगणी, तुळस, आंबा, बिबा अशा १२०० रोपट्यांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर,संतोष राऊत,स्वाती शेंडे, अरुणा गायकवाड, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी व्ही. के.करे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता



प्रभाकर महामुनी, जिल्हा उपनिबंधक श्री.साठे, उपविभागीय अधिकारी श्री.ओंकार देशमुख (धाराशिव),श्री. संजय पाटील (कळंब),श्रीमती वैशाली पाटील (भूम) तसेच तहसीलदार,सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी,वनपरिक्षेत्र अधिकारी,उपविभागीय कृषी अधिकारी आणि विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी व वनविभागाचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्री.पुजार आणि डॉ.घोष यांनी पिंपळाचे रोप लावले.तसेच वट सावित्री पौर्णिमा निमित्त महिला अधिकाऱ्यांनी वडाचे रोप लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

# पाणी समस्येवरून राष्ट्रवादी युवक काँग्रेस आक्रमक, १८ जूनपासून आमरण उपोषण

**मुरुम :**– शहरातील नेहरूनगर परिसरातील लिगाडे प्लॉट वस्तीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट बनला आहे. नागरिकांकडून नळजोडणी घेतली गेली असली तरी आजपर्यंत नळांना एकदाही पाणी आलेले नाही. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आता आक्रमक भूमिका घेत, १८ जून २०२५ पासून मुरुम नगरपरिषदेसमोर आमरण उपोषण छेडण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने नगरपरिषद मुख्याधिकारी यांना मंगळवारी स्मरणपत्र देण्यात आले असून, त्यात ३० मे रोजी पाठवलेल्या पत्राचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. स्मरणपत्रात नमूद करण्यात आले आहे की, लिगाडे प्लॉट भागात नळजोडणी घेऊनही नागरिकांना अजूनपर्यंत पाणी मिळालेले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे संबंधित भागात टाकण्यात आलेली पाईपलाईन अद्याप मुख्य पाईपलाईनशी जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या स्थितीत नगरपरिषदेकडून हजारो रुपयांची नळपट्टी नागरिकांना पाठवली जात असून ती पूर्णतः अन्यायकारक असल्याचा आरोप राष्ट्रवादी युवक काँग्रेसने केला आहे. विशेष म्हणजे काही नागरिकांनी घरकुल योजनेसाठी अर्ज केल्यानंतर त्यांना नळपट्टी भरल्याशिवाय हप्ता मिळणार नाही, असे उत्तर देण्यात आले आहे. प्रमुख मागण्या त्यात प्रामुख्याने लिगाडे प्लॉट भागात तात्काळ पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी, पाणी सुरू होईपर्यंत नळपट्टीची वसूली थांबवावी व भरलेली रक्कम नागरिकांना परत करावी, घरकुल लाभासाठी नळपट्टीची अट रद्द करून कार्यवाही करावी, या मागण्या येत्या १७ जून २०२५ पर्यंत पूर्ण न केल्यास १८ जूनपासून बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या स्मरणपत्राची प्रत जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, प्रदेश उपाध्यक्ष मा. सुरेश (दाजी) बिराजदार तसेच मुरुम पोलीस ठाण्यासही पाठवण्यात आली आहे. स्मरणपत्रावर बाबा कुरेशी, मोहन जाधव, लखन भोंडवे, सदाशिव सोनकांबळे, मेहबूब नदाफ, राजेंद्र साखरे, महम्मद जिनोद्दीन, परमेश्वर कोळी, वहाब नदाफ, गुळाप्पा कांबळे, लालपाशा जमादार, तुकाराम खरटमल, साळू कोकणे आदी युवक नेत्यांची नावे आहेत.